शासकीय कार्यालये / निमशासकीय कार्यालये / शासकीय महामंडळे / कंपन्या / स्थानिक स्वराज्य संस्था / शासन अनुदानित मंडळे व संस्था इत्यादि ठिकाणच्या सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध करणेबाबत...

---

महिला तक्रार निवारण समित्यांचे कामकाज तसेच निनावी व खोट्या सहीने प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाही...

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. मकचौ २००८/प्र.क्र. ४ / मकक
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ डिसेंबर, २००९.

वाचा : १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९९/७३/मकअ, दि. १९.५.१९९९.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१००३/३६/मकअ, दि. ५.१.२००४.
३. शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग , क्र. मकक-२००७/प्र. क्र./०७/मकक, दि. २६.१२.२००७.

## परिपत्रक

महाराष्ट्र विधानमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीने, कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध करण्यासंदर्भात, केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सार्वजनिक क्षेत्रातील (Public Sector) महिला तक्रार निवारण समित्यांना या संदर्भात करावयाच्या कार्यपद्धतीमध्ये अधिक सुलभता येण्यासाठी मार्गदर्शक सुचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशाखा प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने राज्य शासनाने दिनांक १९.५.१९९९ च्या शासन निर्णयान्वये राज्य स्तरीय महिला तक्रार निवारण समितीचे गठण केले आहे. तसेच दि. ५.१.२००४ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सर्व विभागासहित सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांना महिला तक्रार निवारण समित्या गठित करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण करण्याच्या संदर्भात कालमर्यादा कशी असावी याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक २६.१२.२००७ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. विभागीय, जिल्हा, तालुका स्तरावरील क्षेत्रिय कार्यालयाच्या ठिकाणच्या महिला तक्रार निवारण समित्यांनी चौकशी करून सादर केलेल्या चौकशी अहवालाबाबत तसेच निनावी व खोटया सहीने प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाही कशा प्रकारे करावी, याबाबत आधिक मार्गदर्शक कार्यपद्धती ठरविण्याची आवश्यकता आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता, मंत्रालयातील सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील प्रशासकीय विभाग व विभागप्रमुख यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१) तालुका व जिल्हा स्तरावरील महिला तक्रार निवारण समित्यांनी करावयाची कार्यवाही :-**

शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने तालुका तसेच, जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या महिला तक्रार निवारण समित्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबतचा अहवाल तयार करावा. त्या त्या कार्यालय प्रमुखाने सदर अहवालामध्ये पुढीलप्रमाणे माहितीचा समावेश करावा. **अ) प्राप्त झालेल्या तक्रारीची संख्या ब) तक्रारीचे स्वरुप क) चौकशी पूर्ण करण्यात आलेली प्रकरणे ड) चौकशीची कार्यवाही सुरु असल्यास चौकशीची सद्यःस्थिती** इ. बाबत प्रकरणनिहाय सविस्तर माहिती अंतर्भूत असलेला सदर अहवाल संबंधित विभागाच्या विभाग स्तरीय कार्यालय प्रमुखाकडे (HOD) पाठवावा. विभागीय स्तरीय कार्यालय नसेल तर थेट मंत्रालयीन प्रशासकीय विभागाला माहिती पाठवावी. सदर अहवाल **प्रत्येक महिण्याला सोबत** जोडलेल्या **विवरणपत्र-१** मध्ये सादर करावा.

**२) विभागीय स्तरावरील महिला तक्रार निवारण समित्यांनी करावयाची कार्यवाही :-**

तालुका / जिल्हा स्तरावरील महिला तक्रार निवारण समित्यांकडून अशाप्रकारे अहवाल प्राप्त झाल्यानंतर विभागीय स्तरावरील प्रशासकीय प्रमुखांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीसंबंधी वर नमूद केल्यानुसार त्यांचेकडील सविस्तर माहितीचा अंतर्भाव करुन तालुका, जिल्हा, व विभागीय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे एकत्रित अहवाल आपल्या प्रशासकीय विभागाकडे पाठवावा. सदर अहवाल **पुढील महिन्याच्या १० तारखेपूर्वी** मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे सादर होतील याबाबत दक्षता घ्यावी.

**३) प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी करावयाची कार्यवाही :-**

यासंदर्भात आपल्या प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रत्येक **तालुका, जिल्हा, विभागीय व** मंत्रालयीन स्तरावरील महिला तक्रार निवारण समित्यांच्या कामकाजाबाबत संबंधित विभागाच्या सचिवांनी आपल्या स्तरावर याबाबत वेळोवेळी आढावा घेवून **पाठपुरावा** करावा. **व दर महिन्याच्या १५ तारखेपूर्वी राज्य महिला** तक्रार निवारण समितीकडे अहवाल पाठवावा.

**संबधित प्रशासकीय विभागांनी आपआपल्या विभागाच्या संकेत स्थळावर (web page) विभागामध्ये गठीत करण्यात आलेल्या महिला तक्रार निवारण समितीचा तपशील, विभागात तसेच क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या, निकालात काढलेल्या तक्रारींची संख्या व प्रलंबित तक्रारींची संख्या यांची माहिती महिला तक्रार निवारण समिती या नावाने स्वतंत्रपणे web page तयार करून ते प्रशासकीय विभागाच्या web page वर विवरणपत्र-२ प्रमाणे माहिती अंतर्भूत करून लिंक करण्यात यावे.**

३. **कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणुकीसंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत कार्यवाही** खालीलप्रमाणे करण्यात यावी.

एक) कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक **छळवणुकीसंदर्भात तक्रार अर्ज निनावी खोटया नावाने** केलेला आहे असे प्राथमिक चौकशीअंती आढळून आल्यास, **कोणतेही विशेष कारण असेल तर चौकशी**